क्र·मुंमप्रविप्रा/बैठक/४४

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण,
५ वा मजला, गृहनिर्माण भवन,
वांद्रे[पूर्व], मुंबई – ४०० ०५१·

दिनांक : २८ मे, १९८७

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या दिनांक २७ एप्रिल, १९८७ रोजी झालेल्या ४४व्या बैठकीच्या कार्यवृत्ताची प्रत सोबत पाठविली आहे·

२· सन्माननीय सदस्यांनी या बाबतीत काही हरकती असल्यास त्या कृपया कळवाव्या ही विनंती·

श्र· वि· आसगांवकर
२८/५/८७

[ श्र·वि·आसगांवकर ]
सचिव,
कार्यकारी समिती·

प्रति,

सर्व सदस्य
मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे सर्व अधिकारी·

No.BMRDA/MTG/44.

BOMBAY METROPOLITAN REGION
DEVELOPMENT AUTHORITY,
Griha Nirman Bhavan,
5th floor, Bandra(East),
BOMBAY- 400 051.

Date : 26th May, 1987.

The minutes of the 44th meeting of the Bombay Metropolitan Region Development Authority held on the 27th April, 1987 are enclosed.

2. Members are requested kindly to intimate their objections, if any.

S.V. Asgaonkar 26/5

( S.V. ASGAONKAR )
SECRETARY,
EXECUTIVE COMMITTEE.

To:

All Members.

The Officers of the B.M.R.D.A.

-----------

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या ४४व्या
बैठकीचे कार्यवृत्त

| | | |
|---|---|---|
| दिनांक | : | २७ एप्रिल, १९८७ [सोमवार] |
| वेळ | : | सकाळी ११-०० वाजता |
| सभास्थान | : | समिती कक्ष, सहावा मजला, मंत्रालय. |

उपस्थित सदस्य :

| | | |
|---|---|---|
| डॉ. व्ही. सुब्रमण्यन्<br>नगर व विकास, गृहनिर्माण मंत्री | -- | अध्यक्ष |
| श्री. विलास विष्णू सावंत<br>नगर विकास राज्यमंत्री | -- | सदस्य |
| डॉ. रमेश यशवंत प्रभू<br>मुंबईचे महापौर | -- | सदस्य |
| श्री. पुष्पकांत अनंत म्हात्रे<br>अध्यक्ष, स्थायी समिती<br>बृहन्मुंबई महानगरपालिका | -- | सदस्य |
| श्री. रमणलाल छोटालाल अंकलेश्वरीया<br>नगरसेवक, बृहन्मुंबई महानगरपालिका | -- | सदस्य |
| श्रीमती इंदुमती त्रि.पटेल<br>नगरसेविका, बृहन्मुंबई महानगरपालिका | -- | सदस्या |
| श्री. चंद्रशेखर प्रभू,<br>विधानसभा सदस्य | -- | सदस्य |
| श्री. स.शं. तिनईकर,<br>आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका | -- | सदस्य |
| श्री. दिनेशकुमार जैन,<br>शासनाचे सचिव, नगर विकास विभाग | -- | सदस्य |
| श्री. के.नलीनाक्षन,<br>व्यवस्थापकीय संचालक, सिडको | -- | सदस्य |
| श्री. एस.आर.काकोडकर<br>महानगर आयुक्त | -- | सदस्य-सचिव |

......२/-

बैठकीच्या सुरुवातीस प्राधिकरणाने, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे भूतपूर्व सदस्य श्री.हंसराज य.भुग्रा यांच्या दु:खद व अकाली निधनाबद्दल शोक व्यक्त करून त्यांच्या स्मृत्यर्थ एक मिनिट स्तब्धता पाळली. श्री.भुग्रा यांच्या निधनामुळे अतिशय हानी झाल्याचे व या घटनेने प्राधिकरणाला दु:ख होत असल्याचे नमूद करणारा एक शोक ठराव नंतर प्राधिकरणाने संमत केला. [कृपया जोडपत्र पहावे].

त्यानंतर अध्यक्षानी डॉ.रमेश य.प्रभू, मुंबईचे नवे महापौर आणि श्री.पुष्पकांत अ.म्हात्रे, बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या स्थायी समितीचे नवे अध्यक्ष यांचे हार्दीक स्वागत केले; आणि माजी सदस्य श्री.दत्ता नलावडे, मुंबईचे माजी महापौर आणि श्री.चंद्रकांत पडवळ, बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या स्थायी समितीचे माजी अध्यक्ष यानी प्राधिकरणाचे सदस्य या नात्याने केलेल्या उल्लेखनीय कार्याचा कृतज्ञतापूर्वक उल्लेख केला.

त्यानंतर प्राधिकरणाने कार्यसूचीतील विषय विचारविमर्शासाठी घेतले

बाब क्र.१ : मागील [४३व्या] बैठकीचे कार्यवृत्त पक्के करणे

वरील कार्यवृत्त पक्के करण्यात आले.

बाब क्र.२ : शिवडी येथील घाऊक सुकी मासळी बाजारपेठेचे स्थलांतर

२.१ वरील बाब बैठकीत सादर करताना महानगर आयुक्तांनी असे निवेदन केले की, सध्या शिवडी येथे असलेली सुकी मासळी बाजारपेठ १.७ हेक्टर जमिनीवर वसलेली आहे. या बाजारपेठेत आवक होणाऱ्या सुक्या मासळीपैकी जवळजवळ ९० टक्के माल रस्ता मार्गे परिवहनाने, ७ टक्के माल रेल्वे मार्गाने आणि ३ टक्के माल समुद्रमार्गे येत असतो. त्याचप्रमाणे सध्याच्या बाजारपेठेतून वेगवेगळ्या ठिकाणी जावक होत असलेल्या मासळी मालाचे प्रमाण रस्ता परिवहनाने [९०टक्के], रेल्वेने [७टक्के] व समुद्रमार्गे [३टक्के] इतके आहे. नवीन बाजारपेठेची स्थापना आणि तिचा भावी विस्तार नजरेसमोर ठेवता दोन्हीसाठी मिळून साधारणपणे ६ हेक्टर जमीन लागेल आणि अशा बाजारपेठेचे स्थान हे सहजगत रस्ता प्रवेशाने जोडलेले पण लोकवस्तीपासून दूर असणे आवश्यक आहे. महानगर आयुक्तांनी आपल्या निवेदनात दक्षिण मुंबईतील गर्दीसदृश्य स्थितीचे विरळीकरण करणे आणि पर्यावरणात्मक सुधारणा करणे ही या प्राधिकरणाची उद्दीष्टे असल्याचा उल्लेख केला. ते म्हणाले की, नवीन

......३/-

मुंबईत कांदा-बटाट्याच्या घाऊक बाजाराचे अगोदरच स्थलांतर करण्यात आलेले आहे. तसेच भाजीपाला व फळे, लोखंड व पोलाद बाजारपेठ आदी मालाच्या घाऊक बाजारपेठांच्या स्थापनेसाठी योग्य तरतूद असून सध्या त्यांचे स्थलांतर होऊ घातले आहे असे असले तरी सुक्या मासळीच्या घाऊक बाजारपेठेबाबतीत सिडकोने नवीन मुंबईत जमीनीची तरतूद केल्याचे दिसत नाही, तथापि, या मासळी बाजारपेठेसाठी देखील नवीन मुंबईत सुयोग्य जमीन राखून ठेवणे सिडकोला अवघड ठरू नये हे, त्यांनी निदर्शनास आणून दिले...

२.२. सुक्या मासळी बाजारपेठेच्या स्थलांतराची नवीन स्थळे म्हणून वाशी आणि वडाळा-अँनिक या संभाव्य पर्यायांच्या योग्यायोग्यतेवर बैठकीत प्रदीर्घ चर्चा झाली. काही सदस्यांनी असे मत व्यक्त केले की, वडाळा-अँनिक हा भाग मुंबई बेट क्षेत्रात येत असल्याने आणि बेट भागाचे विरळीकरण करणे हे उद्दिष्ट मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाला सर्वसाधारणत: अभिप्रेत असल्याने घाऊक सुकी मासळी बाजारपेठेसाठी वडाळा-अँनिक हे स्थळ मुक्रर करणे इष्ट होणार नाही. मुंबईत सुकी मासळीची आवक प्रामुख्याने ट्रक वहातुकीने होते व वेगवेगळ्या ठिकाणी ट्रकनेच तिचे वितरण होत असते. त्यामुळे मुंबई शहरातील गर्दीसदृश्य स्थितीवर अधिक ताण पडेल आणि त्यास्तव ही बाजारपेठ नवीन मुंबईत हलविणे योग्य ठरते हे या संदर्भात निदर्शनास आणून देण्यात आले. याशिवाय सध्याची बाजारपेठ मुंबईच्या बेट भागात वडाळा-अँनिक येथे स्थापन केल्यास सुक्या मासळीमुळे सुटणारा असह्य दर्प, माशांपासून त्रास वगैरे मूळ प्रश्न सुटू शकणार नाहीत. त्याउलट नवीन मुंबईत इतर बाजारपेठांच्या स्थलांतर निमित्ताने आवश्यक त्या पूर्वसंरचना अगोदरच अस्तित्वात असल्याने घाऊक सुकी मासळी बाजारपेठ नवीन मुंबईत तुर्भे-वाशी भागात स्थलांतरीत केली जावी आणि सिडकोने त्या प्रित्यर्थ अंदाजे ६ हेक्टर जमीन राखून ठेवावी असा निर्णय प्राधिकरणाने घेतला. या बाजारपेठेसाठी सुयोग्य भू-खंड राखून ठेवण्याच्या सूचनेला व्यवस्थापकीय संचालक, सिडको यांनीही संमती दर्शविली.

बाब क्र.३ : घाऊक लोखंड व पोलाद बाजारपेठेचे कळंबोली येथे स्थलांतर : उप-बाजारपेठ आवारांच्या प्रवर्तन कालावधीत वाढ करण्याबाबत..

प्राधिकरणाने बाब टिप्पणीवर विचारविमर्श केला आणि सिडकोला/ व्यापाऱ्यांना प्रसाधनगृहे/जलकोष, कुंपणाची भिंत आदी अपुरी कामे पूर्ण

.......४/-

करता यावीत आणि प्राप्त स्थितीत लोखंड व पोलाद मालाच्या व्यवहारात विस्कळीतपणा आणि गैरसोय येऊ न देता तो सुरळीतपणे चालू रहाण्याचे उद्दीष्ट साध्य व्हावे आणि हा व्यवसाय सध्या ज्या ठिकाणाहून चालतो तेथील बाजारपेठ उलाढालीवर कोणत्याही प्रकारे विपरित परिणाम होऊन त्यातून गुंतागुंत निर्माण होऊ नये या दृष्टीने या मालाचा व्यवसाय सध्या ज्या ठिकाणाहून चालतो ती ३० एप्रिल, १९८७ या कालावधीपर्यंत यापूर्वी घोषित झालेली उप-बाजारपेठ आवारे त्यापुढे ३१ डिसेंबर, १९८७ पर्यंत लोखंड व पोलादाची उप बाजारपेठ आवारे म्हणून चालू रहावीत असा निर्णय घेतला.

ठराव क्र.३४४ :

" असा ठराव मंजूर करण्यात येत आहे की, हे प्राधिकरण, मुंबई महानगर प्रदेश विनिर्दिष्ट विक्रेय वस्तू बाजारपेठा [स्थल नियमन] अधिनियम १९८३ चे कलम ३ चे उपकलम [१] खालील प्रयोज्य शक्तींचा वापर करुन दि.२९ डिसेंबर १९८६ ची अधिसूचना क्र.टीसीपी/एमएम/आयएन्डएस/८१६ अन्वये घोषित करण्यात आलेल्या उप बाजारपेठ आवारांचा कालावधी दि.१मे, १९८७ पासून दि.३१ डिसेंबर १९८७ पर्यंत याद्वारे वाढवित आहे आणि नंतर लगेच लोखंड व पोलादाचे सर्व घाऊक व्यवहार फक्त नवीन मुंबईतील कळंबोली येथूनच केले जावेत.

" त्यापुढे असाही ठराव मंजूर करण्यात येत आहे की, या ठरावाच्या कार्यवाहीसाठी पुढील कृती करण्याकरिता महानगर आयुक्त यांना प्राधिकृत करण्यात यावे व तसे येत आहे."

बाब क्र.४ : मुं.म.प्र.वि.प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम १३ खाली निर्गमित अधिसूचनेच्या व्याप्तीतून वडाळा ट्रक टर्मिनल क्षेत्र वगळता यावे म्हणून सदर अधिसूचनेत फेरफार करण्याबाबत.

महानगर आयुक्त यांनी असे निवेदन केले की, बैठकीत वरील बाब सादर करताना मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम १३ खाली निर्गमित करण्यात आलेल्या अधिसूचनेत करावयाच्या फेरफारांची व्याप्ती ही प्राधिकरणातर्फे स्थापन केले जात असलेल्या ट्रक टर्मिनलच्या विकासातील किंवा त्याच्याशी संबंधित म्हणजे वडाळा खेड्यातील सर्वेक्षण क्रमांक ५, ६[भाग], १/६ [भाग], ३/६ [भाग],

.......८/-

७(भाग), ८, ९(भाग), आणि ८३ मध्ये स्थित असलेल्या विकसनापुरती सीमित असावी. इतर फेरफार हे जरी राज्य शासनाने बृहन्मुंबई विकास नियंत्रणात अगोदरच केलेल्या फेरफाराप्रमाणे असले तरीही ते सध्याच्या अधिसूचनेची मुदत दि.११.१०.१९८७ पुढे वाढविण्यासाठी निर्णय घ्यावयाचा असल्यास त्यावेळी विचारात घ्यावेत असेही महानगर आयुक्तांनी निवेदन केले. त्यानुसार प्राधिकरणाने पुढील ठराव मंजूर केला :

ठराव क्र.३४५ :

"असा ठराव मंजूर करण्यात येत आहे की, हे प्राधिकरण मुं.म.प्र.वि.प्राधिकरण अधिनियम १९७४ चे (१९७५ च्या ४था महाराष्ट्र अधिनियम) कलम १३ चे उप-कलम (१) आणि मुंबई सर्वसाधारण परिभाषा अधिनियम, १९०४ चे कलम २१ याखालील

प्रदत्त शक्तींआधारे मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ चे कलम १३ खाली दिनांक ९ ऑक्टोबर, १९८५ रोजी निर्गमित अधिसूचनेत पुढील फेरफार करण्यास याव्दारे आपली मान्यता देत आहे :

उक्त अधिसूचनेच्या दुसऱ्या खंडानंतर पुढे नमूद असलेला खंड हा २अ खंड म्हणून अंतर्भूत केला जावा :

'२अ. प्रस्तुत अधिसूचनेच्या भाग 'अ' आणि 'ब' मध्ये अंतर्भाव असलेली कोणतीही बाब मुंबई शहराच्या वडाळा खेडयातील शहर सर्वेक्षण क्र.५,६ भाग, १/६भाग, ३/६ भाग, ७ भाग, ८,९ भाग, ८३ मध्ये स्थित असलेल्या कोणत्याही विकसनाला आणि जमिनीला-- जोवर असे विकसन महानगर प्राधिकरणाने मुंबई शहरात हाती घेतलेल्या ट्रक टर्मिनलच्या स्थापनेशी निगडीत किंवा संबंधित असेल तोवर-- लागू होणार नाही.'

"त्यापुढे असाही ठराव मंजूर करण्यात येत आहे की, महानगर आयुक्त, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण याना सदर ठरावाची अंमलबजावणी करण्यासाठी याव्दारे प्राधिकृत करण्यात यावे व तसे येत आहे.

अध्यक्षांच्या संमतीने पुढील दोन बाबी पटल बाबी म्हणून विचारार्थ सादर करण्यात आल्या :

पटल बाब क्र.१ : वांद्रे-कुर्ला समूहाच्या 'ई' ब्लॉकमधील वाणिज्य भू-खंड क्र.सी-१९ व सी-२१ यांची विक्री

प्राधिकरणाने बाब टिप्पणीवर विचारविमर्श केला आणि त्या अनुलक्षाने पुढील ठराव मंजूर केला :-

ठराव क्र. ३४८ :

"असा ठराव मंजूर करण्यात येत आहे की.हे प्राधिकरण मुं.म.प्र.वि. प्राधिकरण अधिनियम १९७४ चे कलम ३ चे उप-कलम (२) खालील शक्तींचा आणि त्या संदर्भात त्याला सहाय्यभूत ठरणाऱ्या इतर सर्व शक्तीचा वापर करून वांद्रे-कुर्ला समूहाच्या 'ई' ब्लॉकमधील सी-१९ व सी-२१ या क्रमांकाच्या भू-खंडांचे प्रति चटई क्षेत्र निर्देशांक चौ.मी.ला रु.८५००/- (रुपये सहा हजार पाचशे फक्त) या अधिमूल्य दराने खालील अर्जदार संस्थांना नियत वाटप करण्यास यव्दारे आपली मान्यता देत आहे :

| अनु.क्र. | भू-खंड क्र. | अनुज्ञेय परिबध्द क्षेत्र (चौ.मी.) | ज्याला नियत वाटपाने भू-खंड द्यावयाचा आहे त्या अर्जदार संघटनेचे नाव |
|---|---|---|---|
| १. | सी-१९ | ५०८० | महाराष्ट्र राज्य विद्युत् मंडळ (एमएसईबी) |
| २. | सी-२१ | ४४२५ | महाराष्ट्र सहकारी गृहनिर्माण वित्त सहाय्य संस्था (एमसीएचएफएस) |

"त्यापुढे असाही ठराव मंजूर करण्यात येत आहे की.अर्जदाराला नियत वाटपाने दिलेल्या भू-खंडावरील परिबध्द जागेच्या एक-दशांश इतकी जागा १० वर्षांच्या भाडेकरारेदी तत्वावर राज्य शासनाला उपलब्ध करून द्यावी लागेल.

"त्यापुढे असाही ठराव मंजूर करण्यात येत आहे की.या ठरावाच्या कार्यवाहीसाठी उचित वाटणारी कृती करण्यास महानगर आयुक्त यांना याव्दारे प्राधिकृत करण्यात यावे व तसे येत आहे.

त्यापुढे असाही ठराव मंजूर करण्यात येत आहे की.भू-खंडाचे नियत वाटप करण्यात आलेल्या अर्जदाराकडे निष्पादित करण्यात यावयाच्या भाडेपट्टा करारनामा आणि भाडेपट्टा विलेख यांच्या प्र-नमुन्यामध्ये आवश्यकतेनुरुप उचित दुरुस्त्या करण्याकरिता महानगर आयुक्त.मुं.म.प्र.वि.प्राधिकरण यांना याव्दारे प्राधिकृत करण्यात यावे व तसे येत आहे."

-वांद्रे-कुर्ला समूहातील भूखंड देण्याबाबतच्या महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या विनंतीवर सभेमध्ये चर्चा झाली.त्यानुसार मुंबई विद्यापिठाच्या कालीना येथील प्रांगणालगतच्या वांद्रे-कुर्ला समूहाच्या 'जी' ब्लॉकमधील विकसित व्यापारी जमिनीपैकी एक स्वतंत्र

भूखंड महाराष्ट्र लोकसेवा आयोगाला . देण्यासाठी वेगळा करण्याचे तत्वतः ठरले. ही कार्यवाही सुमारे ३ महिन्यात व्हावी असेही ठरेल कारण त्या काळात महाराष्ट्र लोकसेवा आयोगाला भूखंडाकरिता लागणारा निधी उपलब्ध होईल अशी अपेक्षा आहे.

पटल बाब क्र.२ : मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या सेवेतील कर्मचारी वर्गाला रजा प्रवास सहाय्य

प्राधिकरणाने बाब-टिप्पणीवर विचारविमर्श केला.एका सदस्याने प्रस्तावाला पाठिंबा दर्शविला तर इतर अनेक सदस्यांचे असे मत झाले की प्राधिकरणाच्या कर्मचा-याच्या आणि राज्य शासकीय कर्मचा-याच्या वेतन व भत्त्यामध्ये साधर्म्य असल्याने रजा प्रवास सहाय्य सवलतीचे शासन निर्णयाबरहुकूम नियमन केले जावे.काही सदस्यांनी असे मत व्यक्त केले की प्राधिकरणाच्या कर्मचा-याना मुंबई महानगरपालिकेत अस्तित्वात असलेल्या रजा प्रवास सवलत योजनेच्या दराने व अटींवर रजा प्रवास सहाय्य मंजूर करण्याचा विषय हा एक धोरणात्मक प्रश्न आहे कारण ज्या काही संस्थांनी मुंबई महानगरपालिकेची सदर योजना स्वीकृत केलेली नाही त्या संस्थांवर त्यामुळे कोणते संभाव्य परिणाम होतील हे पण विचारात घ्यावे लागेल.त्यामुळे या बाबीवर विचारविमर्श करण्याचे पुढे ढकलण्यात आले.

अध्यक्षांचे आभार मानून झाल्यानंतर बैठकीचे कामकाज समाप्त झाले.

----

जोडपत्र

जोडपत्र

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाची
४४ वी बैठक

दिनांक : २७ एप्रिल, १९८७(सोमवार)

ठराव क्र.३४३ :

"श्री.हंसराज रा.भुग्रा यांचे दिनांक २४ एप्रिल, १९८७ रोजी निधन झाले.श्री.भुग्रा हे या प्राधिकरणाचे आणि त्याच्या अधिपत्याखालील भूतपूर्व स्थायी समितीचे अनुक्रमे दि.३१ मार्च, १९७५ ते दि.१५ नोव्हेंबर, १९७८ आणि दि.३ ऑगस्ट, १९७५ ते दि.१५ नोव्हेंबर, १९७८ या कालावधीत सदस्य होते.सदस्यत्व काळात श्री.भुग्रा यांनी प्राधिकरणाच्या कार्यात व कामकाजात आस्थेने भाग घेतला.हे प्राधिकरण त्यांच्या दुःखद आणि आकस्मित निधनाने फार मोठी हानी झाली असल्याचे नमूद करीत आहे."

------

# MINUTES OF THE FORTY-FOURTH MEETING OF THE BOMBAY METROPOLITAN REGION DEVELOPMENT AUTHORITY

DATE : 27th April, 1987 (Monday)

TIME : 11.00 A.M.

PLACE : Committee Room, 6th Floor, Mantralaya.

MEMBERS PRESENT :

| | |
|---|---|
| Dr. V. Subramanian, Minister for Urban Development & Housing. | - Chairman |
| Shri Vilas V. Sawant, Minister of State for Urban Development. | - Member |
| Dr. Ramesh Y. Prabhoo, Mayor of Bombay. | - Member |
| Shri P.A. Mhatre, Chairman, Standing Committee, Bombay Municipal Corporation. | - Member |
| Shri R.C. Ankleswaria, Councillor, B.M.C. | - Member |
| Smt. Indumati T. Patel, Councillor, B.M.C. | - Member |
| Shri Chandrashekhar Prabhu, M.L.A. | - Member |
| Shri S.S. Tinaikar, Municipal Commissioner, Municipal Corporation for Greater Bombay. | - Member |
| Shri D.K. Jain, Secretary to Government, Urban Development Department. | - Member |
| Shri K. Nalinakshan, Managing Director, C.I.D.C.O. | - Member |
| Shri S.R. Kakodkar, Metropolitan Commissioner. | - Member-Secretary |

At the outset, the Authority condoled the sad and sudden demise of Shri H.R. Bhugra, an erstwhile member of the Authority and observed one minute's silence. The Authority then passed a resolution placing on record its deep sense of loss and sorrow at the passing away of Shri Bhugra (Annexure).

The Chairman then cordially welcomed Dr. Ramesh Y. Prabhoo, the new Mayor of Bombay, and Shri Pushpakant A. Mhatre, Chairman, Standing Committee, Bombay Municipal Corporation and placed on record the appreciation of

services.....

services of the outgoing Members - Shri D.S. Nalawade ex-Mayor of Bombay, and Shri C.S. Padwal ex-Chairman of Standing Committee of Bombay Municipal Corporation.

The items on the Agenda were then taken up for consideration.

Item No. 1 : Confirmation of the minutes of the last (43rd) Meeting of the Authority.

The minutes were confirmed.

Item No. 2 : Wholesale Dry Fish Market at Sewree - Shifting of -

2.1. While introducing the Item, the Metropolitan Commissioner stated that presently Dry Fish Market is situated at Sewree on 1.7 hectares of land. Nearly 90% of the commodity comes to the Market by road transport while 7% by Railway and 3% by Sea. Similarly, the outflow from the existing market to various destinations is predominantly by road transport (90%) and only 7% by Railway and 3% by Sea. The land requirement for new market, including future expansion, is approximately 6 hectares and the location needs to be easily accessible by road but away from the residential locality. He also referred to the objective of the Authority to decongest the activities from South Bombay and bring about environmental improvement. He pointed out that eventhough CIDCO has not made any provision for locating a wholesale dry fish market in New Bombay where other wholesale markets such as onion and potato market, wholesale vegetable and fruits market, iron and steel markets etc. are being shifted, it should not be difficult for CIDCO to set aside suitable land for locating wholesale Dry Fish Market as well.

2.2. The merits of possible alternative locations viz. Vashi and Wadala Anik were debated at length. The members felt that since Wadala Anik is in the Island City and BMRDA's general policy is to decongest the Island City, it will not be desirable to locate the Wholesale Dry Fish Market in Wadala Anik. It was pointed out that since Dry Fish is transported mainly by road, trucks bringing dry fish into Bombay and

distributing.....

distributing it to other areas accentuate the congestion in Bombay City and hence it is desirable to shift the Market to New Bombay. Moreover, the problem of smell flies, etc. in heavily congested residential areas of the Island City caused by existence of Dry Fish Market will not be solved if the market is located in Wadala-Anik. As against this, New Bombay has the necessary infrastructure which is developed to cater to the needs of other wholesale markets being shifted to New Bombay. The Authority, therefore, decided that the Wholesale Dry Fish Market should be located at Turbhe - Vashi on a suitable plot of about 6 hectares to be set aside by CIDCO for the purpose. Managing Director, CIDCO also agreed to allocate a suitable plot for the purpose.

Item No. 3 : Shifting of Wholesale Iron & Steel Market to Kalamboli - Sub-Market Yards - Extension of operational period of Sub-Market Yards.

The Authority considered the Item Note and decided that in order to enable CIDCO/traders to complete remaining items of work such as toilet blocks/water fountains/ compound wall, etc., and bring about smooth transition without needless dislocation and inconvenience in the wholesale trade of iron and steel, the existing places where the wholesale iron and steel trade is conducted and which were earlier declared as Sub-Market Yards till 30th April, 1987 be continued as Sub-Market Yards for a further period ending 31st December, 1987. Accordingly, the Authority passed the following Resolution :

RESOLUTION NO.344 :

"Resolved that in exercise of the powers conferred by sub-section (1) of Section 3 of the Bombay Metropolitan Region Specified Commodities Markets (Regulation of Location) Act, 1983, the BMRDA hereby extends the period of the Sub-Market Yards declared under Notification No.TCP/MM/I&S/816, dated 29.12.1986 for a further period from 1.5.1987 till 31.12.1987 immediately after which all wholesale trading activities in Iron and Steel shall be conducted only from Kalamboli in New Bombay.

"Resolved .....

"Resolved further that the Metropolitan Commissioner be and is hereby empowered to take further necessary action for implementation of the Resolution."

Item No. 4 : Notification under Section 13 of the B.M.R.D.A. Act, 1974 - Modification of so as to exclude area of proposed Truck Terminal at Wadala from the operation of the Notification.

While introducing the Item, the Metropolitan Commissioner stated that for the present the existing Notification issued under Section 13 of the B.M.R.D.A. Act, 1974 needs to be modified only to the extent of excluding the land situated or lying in City Survey Nos.5, 6 (part), 1/6 (part), 3/6 (part), 7 (part), 8, 9 (part), and 83 of village Wadala in so far as the development is connected with or related to the establishment of the Truck Terminal by the BMRDA. The rest of the modifications, even though natural corollary to modifications of relevant Development Control Rules for Greater Bombay by the State Government, be considered while extending, if necessary, the tenure of the Notification for a further period from 11.10.1987. The Authority accordingly, passed the following Resolution :

RESOLUTION NO.345 :

"Resolved that in exercise of its powers under sub-section (1) of Section 13 of the BMRDA Act, 1974 (Maharashtra Act IV of 1975), and Section 21 of the Bombay General Clauses Act, 1904, the Authority hereby approves the following modification to Notification issued under Section 13 of the BMRDA Act, 1974, dated 8.10.1985 :-

After clause 2 of the said Notification, the following clause numbered as clause 2A shall be inserted :-

'2A. Nothing contained in parts 'A' and 'B' of this Notification shall apply to development of any land situated or lying in City Survey Nos.5, 6 (part), 1/6 (part), 3/6 (part), 7 (part), 8, 9 (part) and 83 of village Wadala of the City of Bombay so long

as .....

as development is connected with
or related to the establishment of
the Truck Terminal in the City of
Bombay by the Metropolitan Authority.'

"Resolved further that the Metropolitan Commissioner be and is authorised to implement the Resolution."

The following 2 items were then placed before the Authority as Table Items, with the permission of the Chairman :-

Table Item No.1 : Disposal of Commercial Plots No.C-19 and C-21 in 'E' Block of the Bandra-Kurla Complex.

The Authority considered the Item Note and passed the following Resolution :

RESOLUTION NO.346 :

"Resolved that in exercise of the powers conferred on it under sub-section (2) of Section 3 of the BMRDA Act, 1974, and all other powers enabling it in this behalf, the Authority hereby approves the proposal for allotment of Plots No.C-19 and C-21 in 'E' Block of the Bandra-Kurla Complex to the following organisations at the premium of Rs.6,500/- (Rupees Six thousand five hundred only) per F.S.I. square metre :-

| Sr. No. | Plot No. | Permissible built-up area in square metres | Name of the organisation to whom the plot is to be allotted. |
|---|---|---|---|
| 1. | C-19 | 5060 | Maharashtra State Electricity Board (MSEB). |
| 2. | C-21 | 4425 | Maharashtra Co-operative Housing Finance Society Limited (MCHFS). |

"Resolved further that a condition should be incorporated in the Agreement of Lease that the allottee shall give to the State Government 1/10th of the built-up area on the plot on 10-years hire purchase basis.

"Resolved .....

"Resolved further that the Metropolitan Commissioner be and is hereby authorised to take further suitable action for implementation of this Resolution.

"Resolved further that the Metropolitan Commissioner be and is hereby authorised to make suitable amendments, if necessary, in the form of Agreement to Leare and Lease Deed to be executed with the allottees."

The request of Maharashtra Public Service Commission for allotment of a plot in Bandra-Kurla Complex was also discussed during the meeting. It was decided in principle that a separate plot of land may be carved out of existing developed commercial land in 'G' Block located adjacent to Kalina Campus of Bombay University for allotment to Maharashtra Public Service Commission within 3 months or so by which time Maharashtra Public Service Commission is expected to secure funds for buying a plot.

Table Item No.2 : Leave Travel Assistance for BMRDA Employees.

The Authority considered the Item Note. While one member supported the proposal, several other members were of the view that since pay and allowances of the BMRDA employees are identical with those of Government employees, the Leave Travel Concession to BMRDA employees should continue to be granted as per Government orders. Some members felt that the proposal to grant Leave Travel Assistance at rates and on terms prevailing in Bombay Municipal Corporation involves an issue of larger policy particularly in view of its possible repercussions on other organisations who have not adopted the Bombay Municipal Corporation pattern of Leave Travel Assistance, etc. In view of this, further consideration of the item was deferred.

The meeting then terminated with a vote of thanks to the Chair.

-.-.-.-.-.-.-.-.-.-

ANNEXURE .....

ANNEXURE

## 44TH MEETING OF THE B.M.R.D.A.

DATE : 27th April, 1987 (Monday).

RESOLUTION NO.343 :

"Shri H.R. Bhugra has passed away on 24th April, 1987. Shri Bhugra was a member of the Authority and of the Standing Committee, respectively, during the period from 31.3.1975 to 15.11.1978 and 3.8.1975 to 15.11.1978. During this period, he evinced keen interest in the affairs and working of the Authority. The Authority wishes to place on record its deep sense of loss and sorrow at his sad and sudden demise."

-.-.-.-.-.-.-.-.-.-.

GVG:21587: